# वसई-विरार शहर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय विरार

दि.०४/१०/२०२४

### वसई विरार शहर महापालिका क्षेत्रातील “स्वच्छता ही सेवा” अभियान

केंद्र शासनाच्या निर्देशानुसार वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात दि.१४ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत “स्वच्छता ही सेवा” पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. यावर्षी “स्वभाव स्वच्छता संस्कार स्वच्छता” या संकल्पनेअंतर्गत सदर स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे.

“स्वच्छता ही सेवा” पंधरवडा अभियानांतर्गत दि.१८ सप्टेंबर २०२४ रोजी महानगरपालिकेमार्फत ‘संपूर्ण स्वच्छता’ उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत शहरातील प्रचंड रहदारीच्या सार्वजनिक जागा, अधिक प्रमाणात कचरा होणारी ठिकाणे स्वच्छ करण्याची मोहीम घेण्यात आली. यामध्ये रेल्वे स्थानक, स्काय वॉक, मुख्य रस्त्यांची साफसफाई करण्यात आली.

दि.२१ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ०७.३० ते १०.३० वा राजोडी बीच, विरार पश्चिम येथे ‘स्वच्छता ही भागीदारी’ हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत १० हजारांहून अधिक शाळांतील विद्यार्थी- शिक्षक, महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी, सामाजिक संस्थेचे कार्यकर्ते, पर्यावरण कार्यकर्ते, स्वयंसेवक यांचा सहभाग होता. एकुण ५३ मॅट्रिक टन इतका कचरा संकलित करण्यात आला त्यातील ६६२.१२ कि.ग्र. प्लास्टिक कचऱ्याचे रिसायकल प्रात्यक्षिक (Demonstration) नागरीकांना दाखविण्यात आले. संकलित झालेल्या प्लॅस्टिकपासुन यंत्राद्वारे वापरायोग्य विविध वस्तू (फुलदाणी, की-चेन, इएर रींग इ.) वस्तुंचे प्रदर्शन करून सहभागींना भेट स्वरूपात देण्यात आले.

दि.२१ सप्टेंबर २०२४ रोजी ‘एक पेड माँ के नाम’ (एक झाड आईच्या नावे) या मोहिमेच्या अनुषंगाने राजोडी बीच, विरार पश्चिम या ठिकाणच्या परिसरात वृक्ष लागवड करण्यात आली

सर्वत्र ठिकाणी स्वच्छता करणारे आणि स्वच्छतेची कामे नियमित करणारे सफाई कर्मचारी मित्रांचे कल्याण हा या मोहिमेचा गाभा आहे. त्याअनुषंगाने दि.२३ सप्टेंबर व २४ सप्टेंबर रोजी शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या लाडकी बहिण, आधारकार्ड व वैयक्तिक घरगुती शौचालय या कल्याणकारी योजनांचा लाभ मिळणे बाबत सफाई कर्मचाऱ्यांसाठी 'सफाईमित्र सुरक्षा शिबीर' आयोजित करण्यात आली. एकुण ३००० पेक्षा अधिक सफाई कर्मचाऱ्यांना विविध योजनेंचा लाभ देण्यात आला.

दि.२६ ते २९ सप्टेंबर २०२४ या कालावधीत 'स्वच्छता ही भागीदारी' हा उपक्रमा अंतर्गत स्वच्छ भारत सांस्कृतिक महोत्सव साजरा करण्यात आला असुन यामध्ये टाकाऊ वस्तूंपासून कलात्मक वस्तूंची निर्मिती करणे बाबतचे प्रदर्शन भरविण्यात आले तसेच खाद्य महोत्सवाचेही आयोजन वसई विरार महानगरपालिका प्रभाग समिती सी, शेजारील वाहनतळ, विरार (पू.) येथे करण्यात आले. सदर प्रदर्शना मध्ये एकुण २० बचत गटांनी सहभाग घेतला होता.

दि.२७ सप्टेंबर २०२४ रोजी महानगरपालिका क्षेत्रातील सर्व शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, बाजाराची ठिकाणे, उद्याने इ.ठिकाणी स्वच्छतेची शपथ घेण्यात आली. दि.३० सप्टेंबर ते ०१ ऑक्टोबर २०२४ या दिवशी 'सफाईमित्र सुरक्षा शिबीर' अंतर्गत मनपा सफाई कर्मचाऱ्यांचे व त्यांच्या कुटुंबियांची आरोग्य तपासणी करणेसाठी मनपा वैद्यकीय आरोग्य विभागामार्फत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.तसेच दि.०२ ऑक्टोबर २०२४ रोजी महानगरपालिकेतील सफाई कर्मचाऱ्यांना सुरक्षा साहित्याचे वाटप करण्यात आले व फवारणी करणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांना आरोग्य विमा कार्ड देण्यात आले.

सदर अभियान शाळांतील/महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थी, सामाजिक संस्थेचे कार्यकर्ते, पर्यावरण कार्यरते, स्वयंसेवक यांच्या योगदानाने यशस्वीरित्या पार पाडण्यात आले.